१६५/प

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२५/सं.क्र.१४/का.६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २०/११/२०२५

प्रति,

जिल्हाधिकारी, सर्व
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) वाटपाबाबत...

संदर्भ :- १. आयोगाचा सम क्रमांक दि.०४/११/२०२५ रोजीचा निवडणूक कार्यक्रम..

महोदय/ महोदया,

महाराष्ट्र नगरपालिका व नगरपंचायत निवडणूक नियम, १९६६ मधील नियम १६ (३) नुसार,"एखाद्या उमेदवाराला कोणतेही चिन्ह नेमून देतांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल", अशी तरतूद आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक चिन्ह, आरक्षण व वाटपाबाबत खालील आदेश पारित केलेले आहेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१) महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २०२५, दि.५ मे, २०२५ ; आणि

२) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी ८ नोव्हेंबर,२०२५ रोजी काढलेली अधिसूचना.

सदर आदेशांमध्ये व अधिसूचनेमध्ये नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांना निवडणूक चिन्हाचे वाटप करावे.

उपरोक्त दोन्ही आदेश व अधिसूचना राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर आदेशाच्या व अधिसूचनेच्या प्रती सर्व जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांना या पूर्वीच पाठविण्यात आल्या आहेत.

(राजेंद्र पाटील)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र